# ३. वृत्ते

PAGE NO.
DATE: 28/9/22

घटक - ५

1) वृत्ते म्हणजे काय?
2) अक्षरगणवृत्त
3) मात्रावृत्त (जाती).
4) छंदवृत्त

## ★1. वृत्ते म्हणजे काय?

लेखनाचे दोन प्रकार

| गद्य. | पद्य |
| --- | --- |
| आपल्या मनात जसे विचार येतात तसे ते बोलून दाखविणे याला गद्य म्हणतात. उदा., पंढरीला दिंडी चालली पहा. | लयबद्ध शब्दरचनेला पद्य म्हणतात. किंवा आपल्या मनातील विचार ठराविक क्रमाने लिहून सुरुवात किंवा चालीवर म्हणता येईल या प्रमाणे रचना करणे म्हणजे पद्य. उदा, पहा दिंडी चालली पंढरीला. |

## ★ वृत्ते :

पद्यात जी विशिष्ट शब्दरचना केली जाते. त्यास वृत्त किंवा छंद म्हणतात.

उदा., बुडते हे जन। न देखवे डोळा।
येतो कळवळा। म्हणूनीया।।

* वृत्ताचे प्रकार (3)

1) अक्षरगणवृत्त.
2) मात्रावृत्त.
3) छंदवृत्त.

1) अक्षरगणवृत्त.

1) लघुगुरुअक्षरे.
2) गण
3) यती
4) अक्षरगणवृत्त म्हणजे काय?
5) अक्षरगणवृत्ताचे प्रकार

1) लघुगुरुअक्षरे :
लघु - ऱ्हस्व. ᑌ (अ, इ, उ, ऋ, लृ)
गुरु - दीर्घ. - (आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ)

लघु अक्षर अर्धचंद्राकृती (ᑌ) या चिन्हाने दाखवतात तर गुरु अक्षर आडव्या (-) रेषेने दाखवितात.
लघु अक्षरातील स्वर तसेच हे मिळून तयार झालेल्या अक्षरांना क, कि, कु, कृ. यांना लघु म्हणतात.

गुरु अक्षरे व दीर्घ स्वर मिळून तयार झालेली अक्षरे का, की, कू, के, कै, को, कौ यांना गुरुअक्षरे असे म्हणतात.

* लगक्रम - लघुगुरुच्या क्रमालाच लगक्रम म्हणतात.

लघुगुरु ओळखण्याचे नियम (6)

1) जोडाक्षरापूर्वीच्या लघुअक्षरावर जोर किंवा आघात येत असेल तर ते गुरु मानावे. नसेल तर लघु मानावे.

उदा., पुस्तक — U U          उन्हात U — U

2) जोडाक्षरातील शेवटचा वर्ण ऱ्हस्व असेल तर जोडाक्षर लघु मानावे.

उदा., भास्कर
— U U (स्क = स + क + अ)

3) जोडाक्षरातील शेवटचा वर्ण दीर्घ असेल तर गुरु मानावे.

उदा., लग्ना
— — (ग + न + आ)

4) लघु अक्षरावर अनुस्वार किंवा विसर्ग येत असेल तर ते गुरु मानावे.

उदा., अंगण
— U U (ं)

दुःखाने
— — — (ः)

5) कवितेच्या चरणाच्या शेवटी येणारे लघु अक्षर दीर्घ उच्चारले जाते. म्हणून ते गुरु मानावे.

उदा., पखरण बघ घाली भूवरी पारिजात.
— U — —

6) काही वृत्तांच्या चरणात तीन - तीन अक्षरांचे गट पाडल्यावर शेवटी एक किंवा दोन अक्षरे राहतात त्यातील लघुला 'ल' व गुरुला 'ग' असे नावे दयावीत.
उदा., त्या इंद्र|वज्रासाहि लाजवीते.

त्या इं द्र व ज्रा स हि ला ज वी ते.
– – ∪ – – ∪ ∪ – ∪ – –
त त ज ग ग

★ गण म्हणजे काय ?
1) गण म्हणजे कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप.

2) वृत्तांची लक्षणे ठरविताना पद्याच्या चरणातील अक्षरांचे तीन - तीनचे एक - एक गट करुन लघु - गुरु क्रम मांडून त्याखाली काही अक्षरे लिहिली जातात त्यास गण असे म्हणतात.

| उदा., | र घु ना | य का मा | श णो हे | षि आ ता |
|---|---|---|---|---|
| | ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – – |
| गण :- | य | य | य | य |

★ तीन अक्षरी शब्दांचे लघु गुरु क्रमाने एकंदरी आठ गण पडतात. या आठ गणांना य र त न भ ज स म अशी पुढीलप्रमाणे त्यांच्यात्या स्वरूपात आठ नावे दिली आहेत. याला गणांच्या स्वरूपातील तक्ता.

| अ.क्र. | अक्षर | चिन्ह | गण | लघुगुरूस्थिती. |
|---|---|---|---|---|
| १. | आरंभीचे अक्षर लघू | U – – | य-यमाचा | आद्यलघू |
| 2. | मध्यले अक्षर लघू | – U – | र-राधिका | मध्यलघू |
| 3. | शेवटचे अक्षर लघू | – – U | त-ताराप | अंत्यलघू |
| ४ | प्रत्येक अक्षर लघू | U U U | न-नमण | सर्वलघू |
| 5 | आरंभीचे अक्षर गुरू | – U U | भ-भास्कर | आद्यगुरू |
| 6. | मधले अक्षर गुरू | U – U | ज-जनास | मध्यगुरू |
| 7. | शेवटचे अक्षर गुरू | U U – | स-समरा | अंत्यगुरू |
| 8. | प्रत्येक अक्षर गुरू | – – – | म-मानावा | सर्वगुरू |

PAGE NO.
DATE:

3. यती :-

कवितेचे चरण म्हणताना आपण मध्येच काही अक्षरावर थांबतो या थांबण्याच्या जागेला किंवा विरामाला यती असे म्हणतात.

उदा., मना सज्जना भ, क्तिपंथेच जावे.
वरील ओळीत भ या 6 व्या अक्षरावर यती आहे.

यतीभंग :-

यतीच्या जागी शब्द पुर्ण व्हावा शक्यतो शब्द तोडला जाऊ नये यतीमुळे शब्द तोडला जात असेल तर त्याठिकाणी यतीभंग हा दोष झाला. असे मानले जाते.
उदा., प्रिय आमुचा एक महा - राष्ट्र देश हा.
वरील ओळील महा - राष्ट्र असे शब्द तोडले आहेत.

4. अक्षरगणवृत्त म्हणजे काय?

ज्या रचनेतील प्रत्येक ओळीत अक्षर संख्या लघु-गुरु क्रम व गण सारखे असतात. तसेच यती स्थाने समान असतात. त्यास अक्षरगणवृत्त म्हणतात.
उदा.,
ऐकून थेनू ज पिकस्व र मंजु ळ का.
– - ∪ – ∪ ∪ ∪ – ∪ ∪ –∪ – –

तृतीय संतति

TCP

अलंकार

9. **अतिशयोक्ती**

कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा अधीक फुगवून सांगणे.

उदा., प्रिये तु सांगशील तर सुर्य, चंद्र, ग्रह, तारे तोडून आणून देईन.

- मुंगी उडाली आकाशी तीने गिळले सूर्याला

- दमडी

10. **दृष्टान्त** :

एखादया विषयाचे वर्णन करणा आल्यावर ती गोष्ट पटवून देण्यासाठि त्याच्या अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास दृष्टान्त अलंकार होतो.

उदा., लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा,
ऐरावत रत्न थोर त्यासी अंकुशाचा मार ॥

11. **अर्थान्तरन्यास** :

एखादया सामान्य विधानाच्या (सुत्र / सिध्दांत) समर्थनार्थ विशेष उदाहरण किंवा विशेष उदाहरणावरुन सामान्य विधान केले जाते तेव्हा अर्थान्तरन्यास अलंकार होतो. बोध खलास न सुरवी अही मुखी दुग्ध होय गरल

2) श्वान पुच्छ नलिकेत घातले होईना सरळ.

(खल - दृष्ट
अही - साप
गरल - विष).

- जन - पळ भर म्हणतील हाय हाय

- एका हाते कधी तरी मुळी वाजते काय टाळी.

- जातीच्या सुंदरांना काहीही शोभते.

12. स्वभावोक्ती :

कोणताही प्राणी स्थळ, वस्तू, वा प्रसंग यांचे हुबेहूब पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन केल्यास स्वभावोक्ती अलंकार होतो. उदा., गणपती वाणी बिडी पिताना चावायचा नुसतीच काडी
म्हणायचा अन मनाशीच कि ह्या जागेवर बांधीन माडी.
~~बा सी ने सिताक~~ मर्ढेकर.

- मातीत ते पसरले अतिरम्य पंख.
केले वरी उदर पांडुरंग निष्कलंक.
चंचू तशीच उघडी पद लांबवीले.
निष्प्राण देह पडला श्रम ही निमाले.
रे. टिळक.

13. अन्योक्ती : अप्रस्तुत :

ज्याला बोलायचे आहे त्याला काहीच न बोलता दुसऱ्याला बोलणे याला अन्योक्ती किंवा अप्रस्तुत प्रशंसा अलंकार.
उदा., सांबाच्या पंक्तिते बसशी खेटून शिका मान.
परी तो आस्वाद कुत्ता खेटर उतरील रे तुझा मान.

14. पर्यायोक्त :

एखादी गोष्ट सरळ शब्दात न सांगता ती आडवळणाने सांगणे याला पर्यायोक्त अलंकार म्हणतात.
उदा. तो सध्या बिन भाड्याच्या खोलीत आहे.
तु तर मला उंबराचे फुल आणायला सांगितले.

15. विरोधाभास :

वरकरणी विरोध वास्तविक तसा विरोध नसतो याला विरोधाभास अलंकार म्हणतात.
1) मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास कठीण वज्रास भेदू ऐसे.
2) स्वतः साठी जगलास तर मेलास,
दुसऱ्यासाठी जगलास तर जगलास,

16. असंगती:

कारण एका ठिकाणी आणि त्याचे कार्य दुसऱ्याच ठिकाणी असे जिथे वर्णन असते असे असंगती अलंकार.

उदा., 1) गुलाब माझ्या हृदय फुलला
रंग तुझ्या गालावर खुलला
2) काटा माझ्या पायी रुतला
शूल तुझ्या उरी कोमल का ?

17. सार:

वाक्यातील कल्पना चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडून सत्कर्ष किंवा उत्कर्ष साधला जातो तेव्हा सार अलंकार होतो.

— 1) काव्यात नाटक रम्य, नाटकात शाकुंतल त्यामध्ये चौथा अंक त्यातही चार श्लोक ते.

2) विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली.
नीतीविना गती गेली.
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले.
इतके अनर्थ एका अविद्येने केले.
महात्मा फुले

18. व्याजस्तुती :-

बाहेरून निंदा पण आतून स्तुती किंवा बाहेरून स्तुती पण आतून निंदा व्यक्त केली जात असेल तर व्याजस्तुती अलंकार होतो.

उदा., केवढा उदार रे तू.
आई मुलाला म्हणते अरे चोरा.
तो खूप शहाणा आहे.

19. व्याजोक्ती :- एखादया गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा जेथे प्रयत्न होतो. तेथे व्याजोक्ती अलंकार होतो.

उदा., १) येता क्षण वियोगाचा पाणी नेत्रामध्ये दिसे.
डोळ्यात काय गेले हे म्हणुनी नयना पुसे.
२) आठवण त्याची होता नेत्र पाणावली
सांगे परी मी कांदा कापत होती.

20. चेतनगुणोक्ती :- निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहे असी कल्पना करून मनुष्या प्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे चेतनगुणोक्ती अलंकार होतो.

उदा., १) आला हा दारी उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावर सौख्यांचे देईल ज्याचे त्याला.
२) बालकवींची कविता.